स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
# भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. ०२२-२४०९३११०
०२२-२४०३१४९८
www.cpfmseb.२०११@gmail.com
website:www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, मांटुगा (पु) मं ुबई ४०० ०१९.

**क्र.लेवि/भनिनि/अंतिम प्रदान गट/** No 83

**दिनांक :** 14 FEB 2022

## परिपत्रक क्र. २२१

**विषय** :– भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम प्रदानानंतर सादर करण्यात येत असलेल्या पूरक देयकांबाबत

भविष्य निर्वाह निधीची प्रकरणे निकाली काढत असताना , असे निदर्शनास येते की ,कर्मचाऱ्याच्या निवृत्तीनंतर काही पुरक देयकांवरील उदा. अतिरिक्त भार वेतन , वेतनवाढ फरक , महागाई भत्ता फरक , सा.आ.७४ च्या थकबाकीवरील फरक, रजावेतन फरक इत्यादी पुरक देयकावरील भविष्य निर्वाह निधी रक्कम कमात केली जात नाही त्याला पुर्ण देयक दिले जाते व फक्त कर्मचाऱ्याला दयावयाच्या कंपनीच्या वाटयाकरिता नमूना 'ब' भरुन लेखापरिक्षित करुन भविष्य निर्वाह निधी विभागाकडे पाठविला जातो. परंतु अंतिम प्रदान झाल्याशिवाय पुरक रकमेचा दावा भनिनि विभागास मंजुर करता येत नाही. परिणामी अंतिम प्रदान दावा मंजुर करण्यास विलंब झाल्यास कर्मचाऱ्यास पुरक रकमांवरील मंडळाचा वाटा मिळण्यास विलंब होतो.हे टाळण्यासाठी विभागीय कार्यालयांनी कर्मचाऱ्याची अंतिम प्रदान प्रकरणे भनिनि विभागास सादर करण्यापूर्वी जी पुरक देयके काढण्यात येतील त्यावर भविष्य निर्वाह निधी कमात करुन अनुसुची ( Schedule ) व्दारे सदर रकमा भविष्य निर्वाह निधी विभागास जमा कराव्यात जेणेकरुन कर्मचाऱ्यास पुरक देयकावरील भविष्य निर्वाह निधी वजावटीच्या रकमा व त्यावरील कंपनीचा वाटा अंतिम प्रदानावेळी व्याजासहित मंजुर केल्या जातील व अंतिम देयकामध्ये या रकमा अंर्तभूत असल्यामुळे अंतिम देयके अदा करताना अदा केल्या जातील .

अंतिम प्रदानाची प्रकरणे निकाली काढल्यानंतर सभासदाचे भविष्य निर्वाह निधी खात्याचे सभासदत्व समाप्त होते. त्यामुळे अंतिम प्रदानानंतर कर्मचाऱ्याचे एखादे देयक दयावयाचे असल्यास देयकातुन कर्मचाऱ्याच्या हिश्शाची भविष्य निर्वाह निधी रक्कम कमात करु नये तर त्याला कर्मचाऱ्याचा वाटा व कंपनीचा वाटा असे दोन्ही वाटे पुरक देयके देताना कंपनी स्तरावर अदा करण्यात यावेत. जेणेकरुन कर्मचाऱ्यास पुरक देयकांवरील कर्मचाऱ्याचा वाटा व कंपनीचा वाटा त्वरित अदा होईल. आणि भविष्यात अंतिम प्रदानानंतर सभासदाचे भविष्य निर्वाह निधीचे खाते बंद झाल्यामुळे त्याच्या वैयक्तिक खातेपत्रिकेवर कोणतीही रक्कम शिल्लक राहणार नाही. तसेच त्याचा कोणताही दावा भविष्य निर्वाह निधी विभागाकडे प्रलंबित राहणार नाही.

सचिव/भनिनि
विश्वस्त मंडळ,

प्रति :– प्रेषण यादी प्रमाणे.